वस्त्रउद्योगाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हयाच्या विकासात आर्थीक योगदान (विशेष संदर्भ 2020–2025)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा अंतर्गत पीएच.डी. (वाणिज्य) या पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

– संशोधन –

किशोरी अनिल हिप्पळगे

– मार्गदर्शक –

प्रा. डॉ. डेंगाळे एस.एस.

स्हाय्यक प्राध्यापक

कै. रसिका महाविद्यालय, देवणी जि. लातूर

– संशोधन केंद्र –

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

डिसेंबर 2024

Scanned with OKEN Scanner

प्रस्तावना :

वस्त्रउद्योग हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग आहे. ऐतिहासिक आणि आर्थिक उद्योगापैकी एक आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील प्रमुख औद्योगिक राज्यापैकी एक राज्य आहे. विकासामध्ये या क्षेत्राचे उल्लेखनिय योगदान आहे. येथे वस्त्र उद्योगाने विशेषतः हातमाग वस्त्रउद्योग, खादी क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. छ. संभाजीनगर आणि इतर जिल्हयामध्ये केंद्रीत झालेला वस्त्रउद्योग आहे. नागपुर, सोलापुर, कोल्हापुर जिल्हयात वस्त्रउद्योगाच्या विकासासाठी मोठया प्रमाणावर अभ्यास करण्यासाठी आहेत परंतू यामध्ये वेगळा दृष्टिकोन सुध्दा गरजेचा भाग आहे. छ. संभाजीनगर जिल्हा प्रामुख्याने ऐतिहासीक वारसा आणि पर्यटनासाठी ओळखला जातो. अंजिठा वेरुळ च्या लेण्या, दौलताबादचा किल्ला आणि बिबी का मकबरा यासारख्या ऐतिहासीक स्थळासाठी प्रसिध्द आहे. तसेच वस्त्रउद्योगाच्या विकासासाठी महत्वाचा राहिला आहे. मराठवाडयात संभाजीनगर जिल्हयाने वस्त्रउद्योगातून काही प्रमाणात प्रगती केली आहे. छ. संभाजी नगर ग्रामीण आणि लघु वस्त्रउद्योगासाठी प्रसिध्द आहे. छ. संभाजीनगर जिल्हयातील हातमाग, यंत्रमाग आणि खादी वस्त्रउद्योगाला ऐतिहासीक आर्थिक व सामाजिक दृष्टिाकोनातुन महत्वाचे स्थान मिळाले आहे. या संशोधनामध्ये छ. संभाजी नगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाचा विकासाचा अभ्यास केला जाईल.

इतिहासाचा आढावा :

छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाचा इतिहास औरंगजेबाच्या कार्यकीर्द पासून सुरु होतो. जेथे रेशीम आणि सुती कापड उत्पादनाला चालना देण्यात आली होती. निजाम राज्याच्या काळातही ते हातमाग वस्त्र उत्पादनाचे प्रमुख केंद्र राहिले आहे. स्वातंत्र्यानंतर जिल्हयातील हातमाग आणि खादी वस्त्र उद्योगाला स्वालंबन आणि रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. विशेषतः गांधीवादी विचारसारणीमुळे खादीउद्योगाला सामाजिक आणि सांस्कृतीक महत्व लाभले.

सध्याची परिस्थिती :

Scanned with OKEN Scanner

आजच्या घडीला छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाने आधुनिक तंत्रज्ञानाचा आवलंब करुन यंत्रमाग उद्योगामध्ये प्रवेश केला आहे. तथापी हातमाग आणि खादी क्षेत्र अद्यापही पारंपारीक स्वरुपात कार्यरत आहेत. जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर हातकामगार आधारीत वस्त्र उद्योग चालतो. हे क्षेत्र सामाजिक दृष्टया महत्वाचे असुन महिला उद्योजकता आणि ग्रामीण भागातील आत्मनिर्भरतेस चालता देते.

उद्योगासमोरील आव्हाने :

छ. संभाजीनगर मधील वस्त्रउद्योगाला प्रगतीसाठी अनेक अडथळे आहेत. जसे की, कच्या मालाची अपुरी उपलब्धता, बाजारपेठेतील स्पर्धा, अपुरी तंत्रज्ञान साधने आणि आर्थिक संसाधनाची कमतरता याशिवाय हातमाग उद्योगातील कामगाराची घसरती संख्या, खादी उद्योगाला कमी होणारा प्रतिसाठी आणि आधुनिक यंत्रमाग उद्योगामधील गुंतवणुकीचा अभाव ही ही मोठी आव्हाने आहेत. या पार्श्वभुमीवर छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्र उद्योगाचा विकास त्याच्या ऐतिहासीक योगदानाचा अभ्यास आणि त्यासमोरील आव्हानाचे विश्लेषण करणे अत्यंत महत्वाचे आहे. वस्त्र उद्योगाचा जिल्हयाच्या आर्थिक विकासातील वाटा समजुन घेणे आणि त्याच्या प्रगतीसाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजना सुचविणे हा या संशोधनाचा मुख्य हेतु आहे.

या संशोधनात महाराष्ट्रातील वस्त्रउद्योगाचा ऐतिहासीक आणि सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी उपलब्ध साहित्याचा आढावा घेतला जाईल यात संशोधन, लेख, अहवाल, धोरण पत्रके आणि छ. संभाजीनगर जिल्हयातील स्थानिक पातळीवरील अहवालाचा समावेश असेल.

संषोधनाची उद्दीष्टे :

या अभ्यासामुळे छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाचा इतिहास, आधुनिक विकास आणि आधुनिक परिस्थितीचे सखोल विश्लेषण उपलब्ध होईल यामुळे स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील धोरण निर्मितीसाठी मागदर्शन मिळेल आणि जिल्हयाच्या औद्योगीक विकासासाठी उपयुक्त सुचना सुचविल्या जातील.

1) छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाचा अभ्यास करणे.

Scanned with OKEN Scanner

2) छ. संभाजीनगर जिल्हयामधील खादी वस्त्रउद्योग, यंत्रमाग वस्त्रउद्योग, हातमाग वस्त्रउद्योग यांची सध्याची परिस्थिती आणि त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

3) छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाला स्थानिक आणि जागतीक बाजारात मिळणाऱ्या संधीचा अभ्यास करणे.

4) वस्त्रउद्योगाशी संबंधीत धोरणाचा व त्याच्या परिणामाचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके :

1) लघु व मध्यम वस्त्रउद्योगा उत्पादनाच्या छ. संभाजीनगर जिल्हयातील रोजगार निर्मितीमध्ये महत्वाचा वाटा आहे.

2) आधुनिक तंत्रज्ञान आणि धोरणात्मक पायाभुत सुविधा वस्त्रउद्योगाच्या प्रगतीसाठी सकारात्मक परिणाम करीत आहेत.

3) शासनाच्या योजनामुळे लघु व मध्यम वस्त्रउद्योगांमध्ये गुंतवणुकीचे प्रमाण वाढले आहे.

संषोधनाची मर्यादा :

1) छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाच्या विकासाचे व्यापक चित्र उपलब्ध होईल.

2) ग्रामीण व लघु वस्त्रउद्योगाच्या समस्यावर उपाय सुचविले जातील.

3) स्थानिक पातळीवर रोजगारा निर्मितीसाठी नवे उपाय शोधण्यास मदत होईल.

4) मागील पाच वर्षाच्या आर्थिक कार्यकाळाचा अभ्यास धोरण निर्मितीसाठी उपयुक्त (वर्षे 2020 ते 2021 पासुन वर्षे 2024 ते 2025 पर्यंत)

संशोधन पध्दती :

प्राथमिक माहिती संकलन :

स्थानिक वस्त्र उद्योग आणि खादी वस्त्र उद्योग, हातमाग कामगार, वस्त्र उद्योगातील व्यक्तीशी मुलाखती व क्षेत्रीय सर्व्हेक्षण, प्रश्नावली.

नमुना निवड आणि ऐतिहासीक नोंदी, धोरण पत्रके, वस्त्रउद्योगाशी संबंधीत शासकीय अहवाल.

1) सांख्यकीय विश्लेषणासाठी एक्सेल आणि एस.पी.एस.एस. सॉफ्टवेअर चा वापर.

Scanned with OKEN Scanner

2) गुणात्मक माहिती विश्लेषणासाठी थीमॅटीक ॲनेलिसेस.

नमुना निवडीचे प्रकार :

1) भौगोलिक दृष्टिकोन छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगावर आधारीत नमुना निवडला जाईल.

2) शहरी भाग, यंत्र माग व आधुनिक वस्त्रउद्योगाची केंद्रे निवडले जातील.

3) उद्देश पुर्ण नमुना निवड : संबंधीत वस्त्रउद्योग आणि ग्राहक या घटकावर लक्ष केंद्रीत करुन उद्देशपुर्ण नमुना निवडला जाईल.

4) श्रेणी नमुना : उद्यागोच्या प्रकारानुसार नमुने निवडले जातील.

5) कामगाराचे वर्गीकरण : (पुरुष, महिला, अप्रशिक्षीत व प्रशिक्षीत)

नमुना निवडीचा आकार :

1) उद्यागोची संख्या : हातमाग व खादी वस्त्रउद्योगाचे काही निवडक केंद्राचा समावेश तसेच यंत्रमाग व आधुनिक वस्त्रउद्योगाचा अभ्यास केला जाईल.

2) कामगार व उद्योजकाचा समावेश : ज्यामध्ये किमान 100 कामगार व काही निवडक लघु व मध्यम वस्त्र उद्योजक.

3) ग्राहकाचा नमुना : वस्त्र उद्योगाशी संबंधीत उत्पादने वापरणारे 20 ते 30 ग्राहक.

नमुना निवडीची तंत्रे :

1) यादृश्चिक नमुना : वस्त्रउद्योगातील विविध प्रकारचे प्रातिनिधीक नमुने यादृश्चिक पणे निवडले जातील.

2) उद्देशपुर्ण निवड : विशेषतः यंत्रमागाच्या औद्योगिक केंद्रावर आणि महिला कामगार या उद्योगाशी संबंधीत केंद्रावर भर दिला जाईल.

माहिती संकलनाची साधणे :

1) सर्वेक्षण : कामगार व ग्राहकासाठी प्रश्नावली तयार केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

2) मुलाखती : उद्योजक व खादी आणि हातमाग उद्योगातील अनुभवी उद्योजक यांच्याशी चर्चा.

3) क्षेत्रीय अभ्यास : वस्त्र उद्योग केंद्राना भेट देवुन प्रत्यक्ष निरीक्षण.

4) नमुना निवडताना विचारात घेण्यात येणारे मुद्दे : उद्योग व कामगार यांचे सामाजिक, आर्थिक व भौगोलिक स्वरुप लक्षात घेणे, शहरी व ग्रामीण भागातील उद्योगांचा संतुलीत समावेश करणे, विविध तंत्रज्ञान व उद्योग प्रकारावर आधारीत प्रातिनिधीक माहिती संकलन करणे.

प्रकरणाची रुपरेषा :

महाराष्ट्रातील छ. संभाजीनगर जिल्हयाच्या विकासात वस्त्रउद्योगाचे योगदान एक अभ्यास या संशोधनाच्या उद्दिष्टांचा विचार करुन खालील प्रकरणाची रुपरेखा तयार करण्यात आली आहे. या प्रकरणाव्दारे जिल्हयातील ऐतिहासीक, आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक पैलुवर सखोल अभ्यास करता येईल या अध्ययनामध्ये संशोधनाचा मुख्य पैलुचा समावेश आहे, सैंध्दांतिक पार्श्वभुमी समजुन घेण्यासापासुन ते माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्ष सादर करणे.

प्रकरण नं. 1 : छ. संभाजीनगर जिल्हयाची पार्श्वभुमी

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाला अनुसरुन सविस्तर संशोधनाचे महत्व व आवश्यकता, संशोधनाच्या उद्दिष्टांची मांडणी, संशोधनातील गृहितकांची ओळख, संशोधनाच्या मर्यादा, संशोधन पध्दतीचा आढावा, संशोधन विषयाची व्याप्ती इ. चा समावेश असेल.

प्रकरण नं. 2 : छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाचा आणि शासनाच्या धोरणांचा आढावा.

या प्रकरणामध्ये छ. संभाजीनगर जिल्हयातील काही तालुक्यामध्ये कार्यरत असलेल्या वस्त्रउद्योगाचा अभ्यास करण्यात येईल तसेच शासनाच्या धोरणांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण नं. 3 : संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणामध्ये पुर्वी करण्यात आलेल्या संबंधीत संशोधन, प्रकाशीत पुस्तके व अहवाल यांचा आढावा घेतला जाईल.

Scanned with OKEN Scanner

प्रकरण नं. 4 : छ. संभाजीनगर जिल्हयातील निवडक वस्त्र उद्योगाचे वित्तीय व्यवस्थापपन

या प्रकरणामध्ये काही निवडक वस्त्र उद्योगाचे वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण नं. 5 : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या छ. संभाजीनगर जिल्हयातील वस्त्रउद्योगाला अनुसरुन केलेल्या अभ्यासातून निघालेले निष्कर्ष स्पष्ट करण्यात येतील.

संदर्भग्रंथ सुची :

1) भारतातील वस्त्रउद्योगाचा ऐतिहासीक व आर्थीक अभ्यास

1) चॅटर्जी, पार्थसार्थी : Indian Textile : Past and Present : ऑक्सफर्ड युनिवरसिटी प्रेस, 1995

2) रॉय, तपन The Economic History of India : Textile and Clothing : रुट लेज, 2012

2) खादी आणि हातमाग उद्योगाचा अभ्यास :

1) साठे, पिएन खादी ग्रामउद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्था : यशोदा प्रकाशन, 1980

2) मीश्रा आर.के. : Khadi : The Untlod Story, विकास पब्लीसिंग हाउस, 2014

3) खादी आणि ग्रामउद्योग आयोग केव्हीआयसी, Annual Report on Khati and Village Industries 2020

3) महाराष्ट्रातील वस्त्रउद्योगाचा विकास आणि धोरणे :

1) पाटिल व्हि.एस. महाराष्ट्रातील वस्त्रउद्योगाचा लघु व मध्यम उद्योगांचा अभ्यास लोकवाडमय ग्रंथालय 2015

Scanned with OKEN Scanner

2) Annual Report on Textile Industry in India भारत सरकार 2023.
3) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP : The Role of Textile in Sustainable Development : UNDP 2020)
4) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय विभाग : Statistical Handbook of Aurangabad District : महाराष्ट्र शासन : 2022.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. डेंगाळे एस.एस.
कै. रसिका महाविद्यालय, देवणी लातूर

संशोधक
किशोरी अनिल हिप्पळगे

Scanned with OKEN Scanner